




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे अंक : २६ वा सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# तुकडेबंदी उल्लंघन प्रकरणी तक्रार करूनही टेकाळेंवर अद्याप कारवाईत दिरंगाई

## मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांना बडतर्फ करून नियमबाह्य केलेल्या कामातून भ्रष्टाचारात कमावलेली करोडो रुपयांची चल अचल संपत्ती शासन तिजोरीत जमा करा

## जिल्हाधिकाऱ्यांपासून ते महसूल आयुक्तांपर्यंत सर्वच दाखवतात ढिसाळपण

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील महसूल विभागात कार्यरत भ्रष्टाचाराचे शिरोमणी आणि अत्यंत बेशरमपणे भ्रष्टाचार करणाऱ्या मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाईस मोठी दिरंगाई करण्यात येत आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज एकीकडे सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम करीत आहे, तर दुसरीकडे यासंदर्भात प्रत्यक्ष पुराव्यांसह जिल्हाधिकाऱ्यांपासून ते अमरावती महसूल आयुक्त व एसीबी यांच्या पर्यंत माहिती पोहोचवण्यात आलेली आहे. असे असले तरी टेकाळेंवर कारवाई करण्यास मोठी दिरंगाई होत आहे. यावरून बुलढाणा ते अमरावतीपर्यंत महसूल विभागाचा ढिसाळपणा उघड होत आहे, तर दुसरीकडे टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची घाण काही केल्या साफ होताना दिसून येत नाही. विजय टेकाळे यांनी आपल्या अनेक वर्षांच्या महसूल विभागातील सेवाकाळात भ्रष्टाचाराचे प्रचंड असे विक्रम प्रस्थापित केलेले आहेत. अत्यंत बेशरमपणे, कोडगेपणाने त्यांनी भ्रष्टाचार केले आहेत. कुठलीही लाज-शरम न बाळगता भ्रष्टाचार केलेल्या या नालायक अधिकाऱ्याने प्रशासनाला आपल्या खिशात ठेवले आहे की, अशी शंका आता यायला लागली आहे. टेकाळे यांनी म्हसला बुद्रूक येथे कार्यरत असताना त्यांनी चांडोळ भाग-१ व चांडोळ भाग-२ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन केले. ज्या सरकारी नोकरीत आपण आहोत, त्याच सरकारचे नियम पायदळी तुडवताना या दळभद्री माणसाला कशाचीही लाज वाटली नाही. एव्हढा बेशरमपणा खरं तर येतो कुठून हाच मोठा प्रश्न आहे. टेकाळे यांनी तुकडेबंदीचे उल्लंघन बेकायदेशीररित्या अनोंदणीकृत वाटणीपत्राचे एक-दोन नव्हे तर तब्बल ५० फेरफार मंजूर केले. या माध्यमातून टेकाळे यांनी ज्या शासनाचा पगार खातात, त्याच शासनाच्या महसूलाला लाखो रुपयांचा चुना लावला. एकीकडे शासनाचा पगार गिळायचा आणि दुसरीकडे जोरदारपणे भ्रष्टाचारही गिळायचा, असा आधाशा प्रकार टेकाळेंनी केला आहे. यावरून टेकाळेंमध्ये किती अत्युच्च कोटीचा बेशरमपणा आणि बेदरकारी आहे, याचा अंदाज सूज्ञ वाचकांना येऊ शकतो. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यासंदर्भातील सर्व माहिती ही जिल्हाधिकारी बुलढाणा तसेच विभागीय महसूल आयुक्त सह अमरावती एसीबी यांना पुराव्यांनिशी दिलेली आहे. खरे तर भ्रष्टाचाराची एव्हढी कृष्णकृत्ये केल्यानंतर टेकाळेंसारख्यांवर तात्काळ बडतर्फीची कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र, महसूल विभागाची संपूर्ण यंत्रणाच आतून किडल्याचा प्रत्यय सध्या येत आहे. कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चक्क झोपेचे सोंग घेतले आहे. अधिकाऱ्यांनी आपल्या डोळ्यांवर झापड लावून घेतली असल्या कारणाने त्यांना टेकाळेंचा भ्रष्टाचारच दिसून येत नाही. यावरून हे स्पष्ट होते की, महसूल विभागातील बरेच अधिकारी देखील टेकाळेंच्या भ्रष्टाचारात शेअर होल्डर म्हणून कार्यरत आहेत. कारण टेकाळे भ्रष्टाचारात अडकले तर काही अधिकारी देखील चौकशीच्या जाळ्यात येणार आहेत. त्यामुळे कारवाईच करायची नाही, अशी भूमिका सध्या अधिकारी घेताना दिसून येत आहे. टेकाळे यांनी या तुकडेबंदी अधिनियमाचे उल्लंघन करीत अजीर्ण होईस्तोवर भ्रष्टाचार केला. त्या भ्रष्टाचारातून त्यांनी प्रचंड अशी बेनामी संपत्ती जमवली. आपल्या स्वतःच्या व इतर नातेवाईकांच्या नावावर त्यांनी ही संपत्ती केलेली आहे. विशेष म्हणजे भ्रष्टाचाराची घाण प्राशन करून देखील टेकाळे हे आजही उजळ माथ्याने महसूल विभागात कार्यरत आहेत आणि आज देखील भ्रष्टाचारावर भ्रष्टाचार करीत आहेत. यावरून महसूल प्रशासन सुस्त आणि टेकाळे भ्रष्टाचारात व्यस्त असे भयंकर




घाणेरडे चित्र महसूल विभागात दिसून येत आहे. आता तर महसूलच्या अधिकाऱ्यांनीही बेशरमपणाचे कातडे अंगावर पांघरून घेतले त्यामुळे त्यांच्यातील संवेदनशीलता व ज्या शासनाचा आपण पगार घेतो, त्या शासनाप्रति आपली निष्ठा ते विसरून गेलेले आहेत. या प्रकारामुळे महसूल विभाग दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदनाम होत चालला आहे. महसूलचे अधिकारी तरी गेंड्याचे कातडे पांघरून बसलेले असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र जनतेप्रति आपली बांधिलकी जोपासत भ्रष्टाचारावर प्रहार करीतच राहणार आहे. जोपर्यंत टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची बेशरमी कीड महसूल विभागातून नष्ट होत नाही आणि महसूल विभाग स्वच्छ होत नाही, तोपर्यंत याविरोधात लढतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# गृहखाते खादाड! अफूची शेती राजकीय वरदहस्तानेच दंगली घडविणे सरकारचे षडयंत्र- काँ.प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

**जनसंचलन/बुलढाणा**

नुकतेच चक्क अफूच्या शेतीमधून तब्बल १२ कोटी ६१ लाखांची अफूची झाडे जप्त करण्यात आली. या प्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपली तोफ डागत गृह खात्यावर निशाणा साधला. बुलढाणा जिल्ह्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने २२ फेब्रुवारीला १२ कोटी ६० लाख रुपयाची गांजाची झाडे एका शेतातून जप्त केलीत. या प्रकरणावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, एकटा शेतकरी अशी शेती करू शकत नाही. यामागे राजकीय नेता व राजकीय पाठबळ असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी याची कसून चौकशी करावी. यामागे कोण आहे? हे समोर आणावे. ज्यावेळी बुलढाण्यात अफूची शेती होत होती त्यावेळेस बुलढाण्यासह राज्यातील पोलीस हे हप्ता वसूलीत मशगूल होते, असा हल्लाबोल ही त्यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, सरकार लाडक्या सत्तेत मशगूल आहे.शेतकऱ्यांना आता शेती परवडणे कालबाह्य झाले आहे. त्यामुळे शेतकरी आता मादक पदार्थांच्या शेतीकडे वळला आहे. ही धोक्याची घंटा असून सरकारने लवकर सावध व्हावे. अलीकडे सरकार हेच संविधानाला गुंडाळून काम करत आहे. या देशाचा मालक जनता आहे, सरकारने हे विसरू नये. सध्या राज्यात मोठी महसुली तूट निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे राज्य सरकार अनेक योजना बंद करत आहेत. सरकार लाडक्या सत्तेत मशगूल असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. धार्मिक स्थळांच्या बाबतीत सरकारने योग्य कायदा आणि सुव्यवस्था सांभाळून ती हाताळली पाहिजे. मात्र दंगली घडवणे हा या सरकारचा कट आहे. रवींद्र धंगेकर हे काँग्रेसचे नेते आहेत. त्यांनी भगवा घालून स्टेटस ठेवलं. भगवा हे महाराष्ट्र धर्माचे निशाण आहे. येत्या आठवड्यात ते मला मुंबईला मुक्कामी येऊन भेटणार आहेत. त्यांच्या पक्षांतराबाबत अफवा आहेत.

# मी कोण आहे यापेक्षा मी कसा आहे....

## संपादकीय लेख

मी कोण आहे यापेक्षा मी कसा आहेफ्फ हे जे म्हणतात त्यांचीच कहाणी मी थोडक्यात आपणासमोर मांडत आहे. संघर्ष काय असतो? संयम काय असतो? ध्येय काय असते? हे सर्व प्रश्न आपल्यासमोर केव्हा ना केव्हा उभे राहतात, किंवा परिस्थिती केव्हातरी या प्रश्नापर्यंत आपल्याला घेऊन जाते. लहान असताना आईवडील, गुरूजन आपल्यावर संस्कार करत असतात. पण आईवडीलांची सोबत काही मुलांना मिळत नाही. अशी मुले मनानी खचली जातात. पण काही मुले आपल्या जीवनाचे ध्येय निवडून कोणत्याही संकटांना सामोरे जाण्याची तयारी दाखवून यशस्वी होतातच! असचं एक यशस्वी उदाहरण मी आपल्यासमोर मांडत आहे.

गर्दीत वाट दिसत नाही. तर त्या गर्दीत घुसून हवी तशी वाट निर्माण करावी लागते. योग्य दिशा निवडून त्यावर आयुष्याच्या रेघा ओढणे इतके सोपे आहे का? जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या वळणावर कोणते निर्णय घ्यायचे हे निर्णय घेणे कठीण असतात, पण ते घ्यावेच लागतात! आणि असे निर्णय घेऊन आपले जीवन यशस्वी करणाऱ्या महान व्यक्तीची मी ओळख आपणास या लेखातून करून देत आहे समाजात आपण वावरतो. हा समाज आहे म्हणून आपण आहोत. जीवन जगत असताना समाजाचे भान ठेवून समाजाचे आपण देणे लागतो हे लक्षात घेऊन मिळालेल्या नफ्यातून साठ टक्के रक्कम समाजासाठी देणार्या एका दानशूर, देशभक्त व्यक्तीची ओळख मी आपणास करून देताना मला आनंद होत आहे...

२८ डिसेंबर १९३७ रोजी सुरत येथे एक मुलगा पारशी कुटुंबात जन्मास येतो. पण आई वडील मुंबईत राहत असल्यामुळे या मुलाचे बालपण मुंबईतच सरत असते. हा मुलगा अवघा सहा वर्षाचा असताना या मुलाचे आईवडील विभक्त होतात. यानंतर या मुलाची जबाबदारी त्याच्या आजीकडे येते. या मुलाचे चॅम्पियन स्कूल मुंबई येथून प्राथमिक शिक्षण पूर्ण होते. या मुलाचं आर्किटेक्ट व्हायचं स्वप्न, म्हणून या मुलाचे अँडमिशन त्याची आजी अमेरिकन कॉर्नेल विद्यापीठामध्ये प्रवेश मिळवून देते. हा मुलगा स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी आपण आपल्या पायावर उभे राहून शिक्षण पूर्ण करावयाचे ठरवतो.

एखादा निर्णय घेतला मग कोणत्याही वयात असू दे, जो निर्णय मनापासून आपण घेतो तो पूर्ण होईपर्यंत किंवा ध्येय साध्य होईपर्यंत ती उमीद कदापि थांबू देत नाही, आणि हीच खरी कारणे यश संपादन करण्याची आहेत. अमेरिकेतील शिक्षण कालावधीमध्ये या मुलाने हॉटेलमध्ये भांडी घासण्यापासून ते कारकुनाच्या नोकरीपर्यंत सर्व लहान-मोठी कामे न लाजता केली व तो आपले शिक्षण पूर्ण करत गेला.

या तरूणाने १९५९ मध्ये कॉर्नेल विद्यापीठातील शिक्षण पूर्ण केले आणि १९६२ मध्ये या तरूणाने आपल्या करियरची सुरूवात टाटा स्टील विभागातून केली. त्यावेळी या तरूणाने ब्ल्यू कॉलरच्या कर्मचार्यासह भट्टीमध्ये सुद्धा काम केले. हे एक कठीण काम होते. पण या तरूणाने दिलेल्या जबाबदार्या काळजीपूर्वक पूर्ण करत टाटा समूहाच्या परंपरेनुसार १९७० पर्यंत टाटा समूहाच्या बऱ्याच कंपन्यांमध्ये काम केले. या तरूणाची कामाची पद्धत पाहून या तरूणाला समूहाच्या मॅनेजमेन्टमध्ये प्रमोट करण्यात आले..

१९७१ साली या तरूणाची निवड राष्ट्रीय रेडिओ इलेक्ट्रॉनिक्स कंपनी (नेल्को) चे प्रभारी संचालक म्हणून निवड करण्यात आली. कंपनीचे कामकाज योग्य पद्धतीने हाताळत कंपनीच्या नफ्यामध्ये दोन टक्याहून वीस टक्यापर्यंत कंपनीचा नफा वाढवला. याच काळी देशात आणीबाणी व आर्थिक मंदीतून ही कंपनी बाहेर पडली नाही. याच काळात समूहास ही कंपनी बंद करावी लागली.

हे करत असताना या तरूणाने १९७५ साली हॉवर्ड विद्यापीठातून मॅनेजमेन्टची पदवी मिळवली याच कालावधीमध्ये टाटा समूहाचे तात्कालीन प्रमुख जे. आर. डी. टाटाशी या तरूणाची मुलाकात झाली.

या तरूणाची मेहनत पाहून १९७७ मध्ये त्याला टाटा कंपनीच्या एम्प्रेस मिलची जबाबदारी देण्यात आली. जी मिल अगोदरच दिवाळखोरीत निघाली होती. या तरूणाने या मिलबाबत एक आराखडा कंपनीच्या मॅनेजमेन्टसमोर मांडला. पण अन्य अधिकारी वर्गाला तो मंजूर नव्हता. नंतर ही कंपनी बंद करण्यात आली. या तरूणाचे हे दुसरे अपयश होते. परंतु या सर्व गोष्टीमुळे या तरूणाला बरेच काही शिकावयास, अनुभवयास मिळत गेले.

यश काय असते. त्यामागे किती मेहनत घ्यावी, इतरांशी कसे वागावे. एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी किती संघर्ष करावा, मनावर, बुद्धीवर किती संयम ठेवावा हे या तरूणाने चांगलेच आत्मसात केले होते.

सन १९९१ मध्ये या तरूणाला टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष बनवले गेले. दहा वर्षाचा कालावधी गेल्यानंतर याच तरूणाला १९९१ मध्ये जे. आर. डी टाटांनी टाटा समूहाचे नवे चेअरमन म्हणून नियुक्त केले. कामगारा सोबत राबणारा एक तरूण टाटा समूहाचा चेअरमन होतो.. हे त्या तरूणाच्या मेहनतीचं फळच म्हणावे लागेल.

मी आता या तरूणाचे नाव आपल्याला आनंदाने सांगू इच्छितो.. यांचे नाव ङ्ख्घमा.श्री.रतनजी टाटाफ्फ असे आहे. रतन टाटा जेव्हापासून टाटा समूहाचे चेअरमन झाले तेव्हापासून कंपनी प्रगतीच्या दिशेकडे वाटचाल करू लागली.

मी आता टाटा कंपनीविषयी आपणास थोडी माहिती सांगणार आहे. टाटा समूह पहिल्यापासूनच व्यावसायिक व प्रवासी वाहन बनवत होते. पण भारतातली मध्यमवर्गीय लोकांची समस्या लक्षात घेत ३० डिसेंबर १९९८ मध्ये इंडिका कार बाजारात आणली. रतन टाटानी इंडिकाच्या प्रोडक्शनवर खूप मेहनत घेतली होती. पण ऑटोमोबाईल अँनेलेसिसने गाडीमध्ये बरेच दोष काढले. त्यामुळे, टाटा इंडिकाची बाजारात विक्री कमी होऊ लागली. आणि वर्षभरात ही इंडिकाकार फेल गेली व टाटा मोटर्सला अपयश सहन करून नुकसानही सहन करावे लागले.

या सर्वच कारणामुळे रतन टाटा यांनी ही कार कंपनी विकण्याचा प्रस्ताव फोर्ड कंपनीसमोर ठेवला., पण त्यावेळचे फोर्ड कंपनीचे, चेअरमन बिल फोर्ड यांनी रतन टाटा यांना सरळ उत्तर दिले नाहीतर उलट त्यांचा अपमान करत ङ्ख्घजर तुला कार बनवता येत नव्हती तर तुला या व्यवसायामध्ये पडायला कोणी सांगितले होते.फ्फ असे खडे बोल त्यांना ऐकवले. फोर्डची पहिली मिटींग मुंबईमध्ये झाली त्यानंतरची मिटींग अमेरिका येथे झाली. कंपनीच्या मॅनेजमेन्टमधील अधिकार्यानी तुमची ही कंपनी विकत घेऊन आम्ही तुमच्यावर उपकारच करत आहोत. पण रतन टाटांना हे बोलणे खटकले. त्यांचा अपमान तिथे झाल्यावर त्यांनी सौदा रद्द केला व ते तेथून निघून आले. रतन टाटा यांनी हा सर्व प्रकार संयमाने शांततेने घेतला व आपल्या सहकार्यासोबत परत येऊन पुन्हा इंडिका कारवर काम करून, चुका बाजूस काढून आपली सर्व संपत्ती टाटा मोटर्समध्ये गुंतवली आणि नव्याने टाटा इंडिका २ बाजारात आणली. टाटा इंडिका २ बाजारात आपले नाव करत यशस्वी होत गेली व टाटा मोटर्सने पुन्हा आपले नाव प्रगती पथावर आणले. रतन टाटा यांच्यामुळे टाटा समूह प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना दुसर्या बाजूला फोर्ड कंपनीच्या जगवार आणि लँन्ड रोव्हर बंद पडण्याच्या वाटेवर येऊन थांबल्या होत्या.

या परिस्थितीमध्ये रतन टाटा यांनी फोर्ड कंपनीच्या जगवार व लँड रोव्हरला विकत घेण्याचा निर्णय घेतला. हा सौदा झाल्यानंतर बिलफोर्ड यांनी स्वत: रतन टाटा यांना जगवार व लँड रोव्हर खरेदी करून आपण आमच्यावर उपकार करत आहात पण रतन टाटा यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. किंवा बील फोर्ड यांना त्यांचा अपमान होईल असं काहीही बोलले नाही. त्यांना यावेळी खूप बोलता आले असते, बिल फोर्डने केलेल्या अपमानाचा बदला घेता आला असता, पण त्यांनी असे केले नाही, तर आपण आपल्या कामांमध्ये कसे यशस्वी होऊ याचाच त्यावेळी विचार केला. सर्वसामान्य माणसांचा विकास लक्षात घेऊन भारतीयांचे जीवनमान वाढवणे याची जाणीव रतन टाटा यांना पूर्वीपासूनच होती सर्वसामान्य माणसांना विकत घेता येईल अशी कार बनवण्याचे स्वप्न रतन टाटा यांनी पाहिले होते. सन २००८-०९ मध्ये रतन टाटा यांनी सर्वांना विकत घेता येईल अशी टाटा नॅनो ही कार बाजारात आणली. नवीन टाटा नॅनो बाजारात आल्यावर खूप मोठ्या प्रमाणात कारची खरेदी झाली. पण या कारचे स्वस्त मिळणाऱ्या गाडीत रूपांतर झाल्यामुळे टाटा नॅनोचा खप कमी झाला, त्यानंतर टाटा समूहाने इंटरनेटची प्रसिद्धी ओळखून, ओला कॅब, पेटीएम अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आणि टाटा समूहाचे नावलौकिक करत एका उंच स्थानावर नेऊन ठेवले. देशात दिडशे पेक्षा जास्त कंपन्या, आठ लाखाहून अधिक कामगार टाटा समूहामध्ये काम करत आहेत. दिनांक २८ डिसेंबर २०१२ रोजी त्यांच्या ७५ व्या जन्मदिना निमित्त त्यांनी टाटा समूहाच्या चेअरमन पदावर राजीनामा दिला. रतन टाटा यांची यशस्वी झालेली वाटचाल मी आपणासमोर ठेवली.

रतन टाटा यांच्या वैयक्तिक जीवना बद्दल काही गोष्टी आपल्यासमोर मांडणार आहे. रतन टाटा यांनी लग्न केलेले नाही. सर्वसाधारण सरळ,साधं जीवन जगायला त्यांना आवडते, मुंबईमध्ये एका साध्या घरात ते राहत आहेत. त्यांना पुस्तके वाचण्याचा छंद आहे. तसेच ते प्राण्यांमध्येही चांगले रमतात. सामाजिक भान ठेवत, जपत टाटा समूह आपल्या नफ्यातील ६६% नफादान करते, रतन टाटा यांना बऱ्याच पुरस्काराने गौरवण्यात आले ज्यामुळे २००० साली पद्मभूषणाने व २००८ मध्ये भारतातील दुसरा मोठा पुरस्कार पद्मविभूषण हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# जेवण पडले तब्बल ९०,००० रुपयात पाठलाग करून दीड तोळ्याची सोन्याची चैन हिसकावली!

**जनसंचलन/बुलढाणा**

अलीकडे बुलढाणा शहरात क्राईम वाढतेय. हॉटेलवर जेवण करून परत येत असताना, तब्बल दीड तोळ्याची सोन्याची चैन दूचाकीस्वार दोन अनोळखी इसमांनी हिसकावून नेल्याची तक्रार समोर आली आहे. तक्रारीनुसार, सुमित वसंत अंभोरे रा. तार कॉलनी सुंदरखेड बुलढाणा हा २० फेब्रुवारी रोजी आते भाऊ महेंद्र किशोर मोरे राहणार एकता नगर बुलढाणा हे चिखली रोडवरील वसंत हॉटेल येथे रात्री आठ वाजताच्या सुमारास जेवण करायला गेले होते.दरम्यान स्कुटीने घरी परतत असताना चांडक लेआउट येथे पाठीमागून बजाज पल्सर या दुचाकीवर दोन अनोळखी इसम आले व म्हणाले की, आमच्या गाडीला टक्कर दिली.या कारणावरून ते दोघेही स्कुटीच्या मागे लागले.रात्री साडेअकरा वाजता च्या दरम्यान त्रिशरण चौक येथे खामगाव रोडने वळण घेत असताना,स्कूटीचे चाक खड्ड्यात गेल्याने तक्रारदार खाली पडला. दरम्यान पाठीमागे लागलेल्या अज्ञात २ व्यक्तींनी सुमित वसंत अंभोरे याच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चैन जबरदस्तीने हिसकावून घेतली व मलकापूर मार्गाने बजाज पल्सर या दूचाकीने पळ काढला..अशी तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली आहे.



*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# बापरे, तुम्ही पण अंघोळ करताना करता ही ५ गंभीर कामं?

## वयाच्या ३० मध्येच दिसाल म्हातारे, हार्ट अटॅकचा वाढेल धोका








[illegible]

# कुठं आहे शंभूकन्या भवानीबाईचं सासर?

## या जिल्ह्यात आजही आठ वाडे दिमाखात उभे, वाचा रंजक माहिती

**मुंबई:** [illegible]



[illegible]

# भरधाव वेग अन् दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक, तिघांनी जागीच जीव गमावला, वसईत हळहळ...

**वसई:** [illegible]

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आधी माय-लेकीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं; नंतर नराधमाने दोघींवर केले अत्याचार...



**नागपूर :** नागपूरमधून संतापजनक घटना समोर येत आहे. प्रेमाच्या जाळ्यात अडकवून प्रियकराने प्रेयसीसह तिच्या तरुण मुलीवर देखील बलात्कार केला आहे. एवढ्यावरच न थांबता प्रियकराने दोघींची मोबाइलद्वारे आक्षेपार्ह चित्रफित काढली आणि ती समाजमाध्यमांवर व्हायरल केली आहे. त्यानंतर तो पसार झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी प्रियकराविरुद्ध बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. ४२ वर्षीय प्रियकर हा चालक आहे. जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित महिला दोन मुलींसह राहते. सुमारे दहा वर्षांपूर्वी पीडित महिलेची चालकासोबत ओळख झाली. त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिचे लैंगिक शोषण केले. दरम्यान त्याने महिलेच्या २० वर्षीय मुलीला देखील प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि तिच्यावर बलात्कार केला. या संपूर्ण कृत्याची त्याने मोबाइलद्वारे दोघींच्या आक्षेपार्ह चित्रफीतही काढल्या. याचित्रफीत व्हायरल करण्याची धमकी देऊन तो दोघींचे लैंगिक शोषण करत होता.दरम्यान, त्याने नंतर पीडितांच्या या आक्षेपार्ह चित्रफीत इंस्टाग्रामवर व्हायरल केल्या. ती त्याच महिलेच्या लहान मुलीला दिसली. तिने आई व बहिणीला याबाबत सांगितले. समाजमाध्यमांवर चित्रफीत व्हायरल झाल्याने महिलेने जरीपटका पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून चालकाचा शोध सुरू केला आहे.महिला सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गडद होत चालला आहे. तरुण वासनांध होऊन महिलांसोबत घृणास्पद कृत्य करत आहेत. अशीच एक घटना खळबळजनक घटना मुंबईतून देखील समोर आली होती. दिल्ली क्राइम ब्रांचचा सायबर सिक्युरिटी ऑफिसर असल्याचे सांगून व्यक्तीने तरुणींना फसवले असल्याची घटना उघडकीस आली होती. उच्चभ्रू सोसायटीतील तरुणींना लक्ष्य करुन त्याने आपल्या जाळ्यात ओढले. नंतर त्यांना महागड्या वस्तू देऊन फूस देखील लावली. त्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार देखील केले. शरीराची भूक भागल्यानंतर त्याने तरुणींची आर्थिक फसवणूक देखील केली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले. पोलिसांनी आरोपीला गुजरातमधून अटक केली.


# एकनाथ शिंदे यांनी स्वत:चा पक्ष स्थापन करून फक्त...; संजय राऊत यांचं खुलं आव्हान



**मुंबई :** ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर आव्हान दिलं आहे. एकनाथ शिंदेंना नवीन पक्ष स्थापन करत फक्त पाच आमदार निवडून आणून दाखवण्याचं आव्हान संजय राऊतांनी दिलं आहे. इतकंच नाहीतर पक्ष नाही स्थापन केला तर चिन्ह परत करावं आणि निवडणूक लढवावी, असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना राऊतांनी विखे पाटलांवरही जहरी शब्दात टीका केली आहे. दहावेळा साड्या बदलणाऱ्या लोकांनी आम्हाला शिकवू नये, असं म्हणत राऊतांनी विखेंवर निशाणा साधला. एकनाथ शिंदे एक डरा हुआ आदमी, लोहपुरूष कोण अमित शहा? मग बाळासाहेब ठाकरे कोण, लाचार आहेत हे सगळे घाबरलेले आहेत. खरी शिवसेना कोणती खोटी कोणती हे अमित शहा सत्तेत नसतील तेव्हा कळेल. आज दहशत दबाव , पैशाची ताकद आणि निवडणूक आयोग त्यांच्या हातात आहे. एकनाथ शिंदे यांनी स्वत:चा पक्ष स्थापन करून पाच आमदार निवडून आणून दाखवावेत. इतकंच काय त्यांनी चोरलेलं चिन्ह परत द्यावं आणि नवीन चिन्हावर निवडणूक लढून दाखवावी. बाळासाहेबांच्या घरात चोऱ्या माऱ्या करता आणि अमित शहांची दादागिरी दाखवता. अमित शहा आणि मोदी हे अमृत पिऊन नाही आले कधी ना कधी जायचंच आहे, त्यावेळी जनता निर्णय घेईल की कोण खरं आहे आणि कोण खोटं आहे, असं म्हणत संजय राऊत यांनी शिंदेंना आव्हान दिलं. जे दहावेळा पक्ष सोडून गेलेत, त्यांना पहिलं मंत्रीपद उद्धव ठाकरेंनी दिलं आहे त्यांच्या वडिलांनासुद्धा हे त्यांनी विसरू नये. दहावेळा साड्या बदलणारे लोकं आहेत हे, त्यांनी आम्हाला शिकवू नये. आपण मातोश्रीवर येत होतात आणि जात होतात. तुम्हालाही धक्के बसतील, धक्का बसू नये म्हणून तुम्ही पक्ष बदलता. हिंमत असती तर पक्ष बदलले नसते. ज्या काँग्रेसने तुम्हाला सर्व काही दिलं, ज्या शिवसेनेनेही तुम्हाला सर्व काही दिलं त्यांच्याबद्दल असं बोलता म्हणत संजय राऊतांनी विखे पाटलांवर निशाणा साधला.

# ठाकरे गटात दोन मर्सिडीज दिल्यावर एक पद मिळायचं, नीलम गोऱ्हे यांचा खळबळ जनक दावा...

**मुंबई :** शिवसेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी खळबळजनक दावा केला आहे. ठाकरे गटामध्ये एका पदासाठी दोन मर्सिडीज द्याव्या लागत असल्याचं नीलम गोऱ्हे यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये असे घडलो आम्ही या कार्यक्रमामध्ये बोलताना त्यांनी हा गौप्यस्फोट केला. राजकीय वर्तुळात नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वक्तव्याची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. नेमकं काय म्हणाल्या? जाणून घ्या. २०१९ ला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर आम्हालाही धन्य वाटलं होतं. बाळासाहेबांचा मुलगा मुख्यमंत्री झाला, पण आम्हाला हे माहित नव्हतं की आमदारांनाही भेटी मिळणार नाहीत. कुठल्याच विषयाला भेटी मिळणार नाही, दिवसातून दोन ते तीन वेळा आरटीपीसीआर केली तरी भेट नाही. या गोष्टीचा विचार केल्यावर स्थित्यंतर होतात यामागे अनेक गोष्टी असतात असं नीलम गोऱ्हे यांनी सांगितलं.नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वक्तव्याची सर्वत्र चर्चा होताना दिसत आहे. यावर ठाकरे गटाच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त करत गोऱ्हेंवर जोरदार टीका केली. मला वाटतं की गोऱ्हे या तीस वर्ष पक्षात राहिलं आहे. मला आता दोन वर्ष झाली, त्यामुळे गोऱ्हे यांनी किती कमावलं असेल असा मला प्रश्न आहे. कारण गोऱ्हे या कोणालाच मातोश्रीवर पडीक असायच्या. त्यांच्याकडे जवळपास सगळ्या नेमणुकींचे अधिकार होते, त्यामुळे किती कमाई झाली हे विचारलं पाहिजे. मातोश्रीवर त्या पडीक असायच्या त्यामुळे त्यांनी किती कमावलं हे बघायला पाहिजे, असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, नीलम गोऱ्हे यांनी किती





मार्गाने कसा-कसा पैसा जमा केला असेल? पैशाचे स्त्रोत आणि परदेशात कुठे-कुठे प्रॉपर्टी घेतली? त्यांना जाब द्यायला, जाब हा बरोबरीच्या माणसाल द्यावा लागतो. चापलूसी, बदमाशी आणि मर्जी मिळवून जर पद मिळवणारी लोकं असतील तर अशा लोकांवर बोलवून त्यांची उंची वाढवायची नसते, असं म्हणत सुषमा अंधारेंनी उत्तर दिलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# छावा पाहताना रडू लागला चिमुरडा, कापऱ्या आवाजातील शिवगर्जनेने दणाणले थिएटर



मुंबई: [illegible]

# सांगलीच्या भक्ताची श्रद्धा अपार, तब्बल १३ दिवस ९५ किमी अंतर लोटांगण, जोतिबाच्या पायाशी लीन...



कोल्हापूर : [illegible]

# भावाला मारहाण, बहिणीला झुडूपात नेलं अन् ६ जणांकडून सामूहिक अत्याचार

भिवंडी: [illegible]

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ५ कोटी लोकांना २०२९पर्यंत हक्काचं घर; केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची मोठी घोषणा....


**पुणे:** सर्वांसाठी घरे या अंतर्गत गरीब, गरजू, महिला, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (एससी, एसटी) या घटकांतील देशातील पाच कोटी नागरिकांना २०२९ पर्यंत घरे देण्याचा संकल्प केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने केला आहे, अशी माहिती केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी शनिवारी दिली. पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप आणि दहा लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रमात शहा बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आदी या वेळी उपस्थित होते.शहा म्हणाले, घर नसलेल्यांना हक्काचे घर, घरातच शौचालय, मोफत वीज, उज्वला योजनेंतर्गत सिलिंडर देण्याचे काम केंद्र आणि राज्य सरकार करीत आहे. सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट आहे. त्यामध्ये प्रत्येकाला घर, पाच लाखांपर्यंतचा विमा, पाच किलो धान्य मोफत, वीज आणि सिलिंडर देणे ही विकसित भारताची व्याख्या आहे. महिला, गरीब, एससी, एसटी या घटकांतील देशातील पाच कोटी नागरिकांना सन २०२९ पर्यंत घरे देण्याचा संकल्प मोदी सरकारने केला आहे. गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने चार कोटी लोकांना वीज, १३ कोटी शौचालये, एक कोटी लखपती दीदी आणि ३६ कोटी लोकांना गरिबीतून वर आणण्याचे काम केले आहे.पदेशाला आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा काम करीत आहेत. गेल्या अडीच वर्षांत पंतप्रधान मोदींनी राज्याला आर्थिक मदत केली, तर गृहमंत्री शहा हे भक्कमपणे पाठिशी राहिल्याने अनेक विकासकामे मार्गी लावली. पीएम आवास योजनेसह म्हाडा, सिडको अशा विविध माध्यमांतून घरे देण्यात येत आहेत. याबरोबरच राज्यात लवकरच नवे गृहनिर्माण धोरण आणण्यात येत आहे. त्यामुळे परवडणारी घरे निर्माण होतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.पीएम आवास योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यात देशभरात दोन कोटी घरे देण्यात येणार आहेत. त्यामध्ये जास्तीत जास्त घरे महाराष्ट्राला मिळण्यासाठी प्रयत्न करू,फ अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी दिली.

# आजारपणाला कंटाळून शेतकऱ्याचा शेवटचा निर्णय, पिस्तुलाने डोक्यात झाडली गोळी, पुण्यातील घटना


**पुणे** : आजाराला कंटाळून कुंजीरवाडी येथील धुमाळ मळा परिसरातील शेतकऱ्याने डोक्यात गोळी झाडून



आत्महत्या केल्याची घटना घडली. बाळासाहेब निवृत्ती कुंजीर (वय ६१) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्याकडे परवाना असलेले पिस्तूल होते. त्यातूनच त्यांनी गोळी झाडून घेतली.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाळासाहेब कुंजीर कुटुंबासोबत कुंजीरवाडी परिसरात राहतात. कुंजीर यांना मधुमेहाचा त्रास होता; तसेच त्यांना चार वर्षांपूर्वी करोनाची लागण झाली होती. त्या वेळी ङ्गम्युकर मायकोसिसफ्ची बाधा झाली. त्यात त्यांचा एक डोळा निकामी झाला होता. यामुळे अनेक शारीरिक मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे ते शक्यतो घरातच राहत असत. दरम्यान, कुंजीर यांच्या नातेवाइकांच्या घरी शुक्रवारी कार्यक्रम होता. त्यामुळे घरातील सर्व सदस्य कार्यक्रमाला गेले होते. तेंव्हा कुंजीर घरात एकटेच होते. घरातील मंडळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घरी आली. त्या वेळी कुंजीर यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतल्याचे दिसून आले. त्यानंतर कुंजीर यांच्या मुलाने लोणी काळभोर पोलिसांनी माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच, सहायक आयुक्त अश्विनी राख, लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कुंजीर यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. कुंजीर यांनी आजाराला कंटाळून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

# महिला आयोग सदस्याविना, महायुतीतील तिन्ही पक्षांच्या इच्छुकांची यादी मोठी....

**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ जानेवारी महिन्यात संपुष्टात आला असून, आयोगाचा कार्यभार सध्या या अशासकीय सदस्यांविनाच सुरू आहे. जवळपास महिना उलटला तरी नव्या सदस्यांच्या निवडीचा मुहूर्त मिळाला नसल्याने यावरून आता राजकीय वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या कार्यकारणीत कार्यरत असलेले सर्व अशासकीय सदस्य हे महाविकास आघाडीमधील होते. त्यामुळे आता नव्या कार्यकारणीत समावेशासाठी महायुतीत संघर्ष होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविण्यात येत आहे. केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९९३ रोजी करण्यात आली आहे. या आयोगात अध्यक्षांसह, सहा अशासकीय सदस्य, एक सदस्य सचिव आणि राज्याचे पोलिस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य म्हणून काम पाहत असतात. त्याच वेळी आयोगासाठी सरकारकडून कर्मचाऱ्यांची पदेही मंजूर केली जातात. सध्या राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या रूपाली चाकणकर या काम पाहत आहेत.त्यांची कारकीर्द



१५ डिसेंबरला संपुष्टात आली होती. मात्र सरकारकडून त्यांना तीन वर्षांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याशिवाय आयोगाच्या सदस्य सचिव म्हणून काम करणाऱ्या नंदिनी आवडे यांची नियुक्तीही सरकारकडून २३ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली होती. त्यांचीही निवड सरकारच्या पुढील आदेशापर्यंत कायम राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. दरम्यान, राज्याचे पोलिस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात. त्यानुसार रश्मी शुक्ला यादेखील या आयोगाच्या सदस्य म्हणून काम पाहत आहेत. सध्या राज्याच्या महिला आयोगाच्या सहा अशासकीय सदस्यांमध्ये गौरी छाब्रिया, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सुप्रदा फातर्पेकर, काँग्रेसच्या माजी सदस्या उत्कर्षा रूपवते, शिवसेनेच्या संगीता चव्हाण, दीपिका चव्हाण आणि आभा पांडे यांचा समावेश होता. या सहाही सदस्यांची नियुक्ती २५ जानेवारी २०२२ रोजी करण्यात आली होती. या सहाही सदस्यांची नियुक्ती २४ जानेवारी २०२५ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे सध्या आयोगाचे काम हे सदस्यांविनाच सुरू आहेत. या सदस्यांपैकी जवळपास अनेक सदस्य महाविकास आघाडीमध्ये कार्यरत होते. त्यापैकी काही सदस्य आता महाविकास आघाडीमध्ये नाहीत, त्यांच्या ऐवजी अनेकांनी पक्षांतर केले आहे. त्यामुळे नव्या कार्यकारणीत या सदस्यांपैकी कोणाची वर्णी लागते का, याकडे लक्ष लागून राहिले आहे.
सध्या रूपाली चाकणकर या आयोगाच्या अध्यक्षपदी कार्यरत आहेत. २०२४ मध्ये त्यांना तीन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आल्याने सध्या तरी त्यांच्या नियुक्तीला कोणताही धोका नसल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. मात्र, राज्यातील सध्याचे राजकीय वातावरण लक्षात घेता महिला आयोगाच्या सदस्य पदासाठी महायुतीतील तिन्ही पक्षांच्या इच्छुकांची यादी मोठी असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पक्षाकडून कोणत्या सदस्यांच्या गळ्यात ही माळ पडते, हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवजयंती वारकरी संप्रदायाच्या टाळ मृदंग वाजवत साजरी

जनसंचलन/मलकापूर पांगरा

येथील शिवजन्मोत्सव आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, पांगरा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर, सकाळी ८.३० वाजता मलकापूर पांगरा बस स्टॅण्ड येथे प्रतिमा पूजन करण्यात आले. दुपारी २ वाजता महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम पार पडला. सायंकाळी ५ वाजता, शिवजन्मोत्सवाच्या दिवशी मिरवणूक काढण्यात आली. वारकरी संप्रदाय टाळ-मृदंग वाजवत, लेझीमच्या तालावर भजन गात होते. रथाचे आकर्षक प्रदर्शन आणि रोषणाई मिरवणुकीला आणखी उजाळा देत होते. विशेष म्हणजे, मिरवणूक डीजेमुक्त होती. ज्यामुळे पारंपरिक आणि भक्तिमय वातावरण अधिक भक्तिपूर्ण व आकर्षक बनले. शिवशंभो प्रतिष्ठान आणि शिवजन्मोत्सव



समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# महिलाचे संघटन काळाची गरज-नंदिनी टारपे

## आंध जमातीतील कृतृत्ववान महिलाच्या पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न.

जनसंचलन/बुलढाणा

विदर्भात मागिल तीन महिन्यापासून आंध आदिवासी महिलांचे प्रबोधन मेळावे व महिलाचे संघटन मोठ्या प्रमाणात चालू असून आता पर्यंत अकोला, पातूर, वाशिम मंगरुळपीर प्रबोधन मेळावे संपन्न झाले ,मेहकर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे निमित्ताने हनुमान टेकडी हनुमान मंदीरात समाज प्रबोधन व महिला संघटनेचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मंगलाताई डाकोरे होत्या यावेळी प्रमुख मार्गदर्शक आदिवासी विकास परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष नंदिनीताई टारपे होत्या त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून कार्तिका ठाकरे, वाशिमच्या जिल्हा अध्यक्ष सीता धंदरे,मंगला ढगे, छाया डाकोरे मुक्ता ढोके, वैष्णवी ढोले, शकुंतला पांडे,शारदा फुपाटे, रंजना कोकाटे, मिरा धनजकर,मंगला डाकोरे पार्वती लठाड आदी मान्यवर महिला होत्या. यावेळी आदिवासी विकास परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष तथा कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक नंदिनी टारपे आपल्या भाषांनातून बोलताना म्हणाल्या आज संपूर्ण देशात आदिवासी महिलावर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार वाढला असून आदिवासी महिलांचे जगणे कठीण झाले आहे, या अन्यायाल वाचा फोडायची असेल तर महिलाचे संघटन होणे काळाची गरज आहे.

त्याच बरोबर महाराष्ट्रात आंध आदिवासी जमात मोठ्या संख्येने असून आंध जमातीतील महिला अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीत व राजकीय क्षेत्रात काम करत आहेत पण त्या आदिवासी असल्यामुळे त्याची नोंद कुठेही घेतल्या जात नाही. परंतु प्रा. डॉ. राजेशजी धनजकर सरांनी आंध आदिवासी जमातीतील सामाजिक राजकीय चवळीत काम करणाऱ्या महिलांची दखल घेऊन त्याच्यावर पुस्तक लिहिले त्यामुळे काम करणाऱ्या महिलांना आपल्या आयष्यात आणखी काम करण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे, त्यामुळे येणाऱ्या पिढीला त्याचा मोठा फायदा होणार आहे. यावेळी अकोला, वाशिम व बुलडाणा जिल्ह्यातील अनेक महिलांनी वैचारीक प्रबोधनात्मक भाषण केली.या कार्यक्रमात आदिवासी आंध जमातीची लोकसंस्कृती व आदिवासी आंध जमातीतील कर्तुत्ववान महिला असे दोन पुस्तकाचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.मा. माजी समजकल्याण मंत्री तथा आदिवासी विकास मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे साहेब यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झाले आहे.यावेळी प्रमुख पाहुणे जानकीराम डाकोरे साहेब माजी




जिल्हा परिषद अध्यक्ष भास्कर ठाकरे प्रा. डॉ. राजेश धनजकर,भगवानराव कोकाटे,नंदिनीताई टारपे होत्या, प्रमुख पाहुणे प्रा.धनजकर सर यांनी महिला बदल मत व्यक्त केले,आंध जमातीतील कृत्वात्वन महिलांवर पुस्तकं लिहिण्याची प्रेरणा माजी शिवाजीराव मोघे साहेबांनी दिली. त्यामुळेच पुस्तकं लिहू शकलो असे ते म्हणाले येणाऱ्या काळात नवीन तरुण पिढीला या पुस्तकाच्या माध्यमातून प्रेरणा मिळणार आहे.मा.मंत्री शिवाजीराव मोघे साहेब यांनी यावेळी महिलांना मार्गदर्शन केले.

आंध आदिवासींचे जमतातील महिलांच्या भविष्याला गती देण्याकरिता व प्रगतीच्या दिशेने जाण्याकरिता सदरील कार्यक्रमाचे आयोजिन केले. या कार्यक्रमाला बुलढाणा अकोला व वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला आणि पुरुषांनी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती करवते,लता गिऱ्हे यांनी केले,प्रास्ताविक राधिका डाकोरे आभार प्रदर्शन वंदना लेकुरवाळे यांनी केले.

# शिवाजीराव तायडे यांना अंभोडा भुषण पुरस्कार प्रदान

जनसंचलन/बुलढाणा



महाराष्ट्र मराठा सोयरीक या सामाजिक लोक चळवळीच्या वतीने समाजासाठी निस्वार्थपणे सेवाभावी दृष्टिकोनातून काम करणाऱ्या समाज बांधवाना दरवर्षी सन्मानित करण्यात येते. यावर्षी बोदवड येथे १९ फेब्रुवारी रोजी जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे यांना अंभोडा भुषण व जेष्ठ साहित्यिका सौ. मालिनीताई सवडदकर यांना समाजरत्न पुरस्कार मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिवाजीराव तायडे हे सहकाराच्या माध्यमातून अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांचा संसाराचा गाडा हाकलायला हातभार लावीत असतात. स्वतच्या गावांसाठी सुद्धा त्यांची मोठी कामगिरी आहे. अंभोडा येथील स्मशानभूमीचा त्यांनी कायापालट केला आहे. स्मशानभूमीत त्यांनी मोठ्याप्रमाणात झाडांची लागवड व सुशोभीकरण केले आहे. कुठल्याही प्रकारचे समाजिक कार्य असल्यास त्याठिकाणी शिवाजीराव तायडे हे निस्वार्थपणे तन-मन-धनाने मदत करीत असतात. प्रत्येक मेळाव्यात येणाऱ्या लेकरांच्या पोटात दोन घास जावेत म्हणून भोजन व्यवस्थेसाठी दरवर्षी त्यांचा मोठा सहभाग असतो. बुलढाण्यात समाजभान जपणारं व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. नुकत्याच बुलढाणा येथे संपन्न झालेल्या मेळाव्यामध्ये अतुलनीय अशी कामगिरी केली त्याचे समाजाच्या वतीने कौतुकही झाले. यावेळी मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मालिनीताई सवडदकर यांना समाजरत्न व शिवाजीराव तायडे यांना अंभोडा भूषण पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमात वधू-वरांनी आपला परिचय करून दिला. मेळाव्यास सुनिल पाटील जवंजाळ, राजेंद्र ढोकणे, मधुकरराव बोरसे, कैलास चौधरी, डॉ. बाबुराव महाजन, संजय पाटील, विशाल तांगडे, निवृत्ती ढोले, शैलेश वराडे, आनंदराव देशमुख, दिनेश कदम, सुभाष चौधरी, नारायण राऊत, साहेबराव जवंजाळ, डॉ. आसाराम काजळे, किशोर शेळके, संजय जपते, माधवराव देशमुख, नाना पाटील, अनिल दांदडे, डॉ. सागर महाजन, सुरेखा सावळे, सुनीता जाधव यांनी सहकार्य केले.

# परीक्षा केंद्रातील कॅमेऱ्यांची तोडफोड...

जनसंचलन/ साखरखेर्डा



साखरखेर्डा येथील जिजामाता विद्यालयातील दहावीच्या परीक्षा केंद्रात सीसी कॅमेऱ्याची तोडफोड करण्यात आली आहे. या प्रकरणी मुख्याध्यापकांनी २१ फेब्रुवारी रोजी साखरखेर्डा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. येथील तीन परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांची दहावीची परीक्षा सुरू आहे. शिवाजी हायस्कूल, एस.ई.एस. हायस्कूल व जिजामाता विद्यालयात तसेच गुंज येथील स्व. भास्करराव शिंगणे माध्यमिक शाळा, सहकार विद्या मंदिर, उर्दू हायस्कूल आणि अनिकेत सैनिक स्कूलचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. २१ फेब्रुवारी रोजी मराठी विषयाचा पेपर झाला. त्या दिवशी विद्यालयाच्या मागील भागातील दोन सीसी कॅमेरे बंद असल्याचे मुख्याध्यापक शिवशंकर मखमले यांच्या लक्षात आले. त्यांनी निरीक्षण केले. रात्री कोणीतरी त्यातील कॅमेऱ्यांची तोडफोड केली असल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांनी तक्रार दिली. याप्रकरणी साखरखेर्डा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. काही परीक्षार्थींचे हितचिंतक गैरमार्गाने कॉपी पुरविताना आढळून येतात. त्यातून ही तोडफोड करण्यात आली का, या दिशेने साखरखेर्डा पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# राजर्षी शाहू मल्टीस्टेटने सामान्यांना पाठबळ दिले- डॉ. रतनसिंग राजपूत

## खामगाव शाखा स्थलांतराचा उद्घाटन सोहळा उत्साहात : रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/ खामगाव

सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्य घटकांना पाठबळ देण्याचे काम राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या माध्यमातून केले जात आहे. पारदर्शक व्यवहारातून ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याने या पतसंस्थेची नक्कीच भरभराट होणार, असे प्रतिपादन समाजसेवक डॉ.रतनसिंग राजपूत यांनी केले. राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या खामगाव शाखा स्थलांतराचा उद्घाटन सोहळा शाहू परिवाराचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब शेळके यांच्या हस्ते २१ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. स्थानिक सकळकळे कॉम्प्लेक्स, टॉवर चौकात हा कार्यक्रम झाला. यावेळी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, नानाभाऊ कोकरे, राष्ट्रवादी नेते देवेंद्र देशमुख, संस्थापक अध्यक्ष आणि शिवसेना उबाठाचे जिल्हा समन्वयक संदीप शेळके,



संस्थाध्यक्षा मालती शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महिलेवर ब्लेडने वार,गुन्हा दाखल



जनसंचलन/मोताळा

घुस्सर येथील एका ४२ वर्षीय महिला आणि तिच्या पतीस मारहाण करत महिलेवर ब्लेडने वार करून जखमी केल्याची घटना २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी घडली. याप्रकरणी बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घुस्सर येथील शालिनी शेषराव मुके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी त्या घरात काम करीत होत्या. त्यावेळी हॉलमध्ये आरडाओरडा करण्याचा आवाज आला. गावातीलच देवानंद किसन जाधव त्यांच्या पतीला मारहाण करीत होता. त्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता, देवानंद जाधव यांनी महिलेला मारहाण केली, तसेच ब्लेडने वार करून जखमी केले. या झटापटीत महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोथ आणि मंगळसूत्र तुटून पडले. याप्रकरणी देवानंद जाधव यांच्या विरोधात बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# हेल्मेटधारक वाहनचालकांचे स्वागत.. तर नियम तुडविणाऱ्यांवर कारवाईचा दंडूका!



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील त्रिशरण चौकात एका तरुणीचा अपघातात जागीच मृत्यू झाला आणि रस्ता सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने वाहतुकीच्या नियमा संदर्भात कारवाईचा दंडूका उगारण्यासह जनजागृती ही केली जात आहे. शिवाय हेल्मेट सक्ती करण्यात आली असून, काही सुज्ञ वाहनधारक हेल्मेट वापर करीत असल्याने त्यांचे ट्रॅफिक पोलिसांकडून अभिनंदन देखील केले जात आहे. निष्पाप नागरिकांच्या रस्ते अपघातात बळींची संख्या लक्षात घेता परिवहन विभाग, पोलीस विभाग तसेच सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी सकारात्मकतेने काम करण्याची गरज निर्माण झाली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक बजावण्या बरोबरच निस्वार्थ भावनेने काम करणे कर्तव्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रस्ता सुरक्षेसंबधी नियमांची कठोरपणे अंमलबजावणी व्हावी,रास्त अपेक्षा असून अपघातातील बळींची संख्या कमी होण्यासाठी प्रयत्न महत्त्वाचे आहे.या दृष्टीने वाहतूक पोलीस शाखेने सध्या पाऊल टाकले आहे.वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा दंडूका उगारणे सुरू केले तर वाहतूक नियम पाळण्यासाठी जनजागृती सुरू केली आहे. दरम्यान सुज्ञ वाहनधारक हेल्मेट सक्ती केल्याने हेल्मेट घालून प्रवास करीत असल्यामुळे त्यांचे ट्रॅफिक पोलिसांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.नागरिकांनीही वाहतूकीचे नियम स्वयंस्फूर्तीने पाळणे आवश्यक आहे. रस्त्यावर चालविण्यात येणारे वाहन सुस्थितीत असावे, वाहनचालकांनी सीट बेल्ट लावावे, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलू नये, अतिवेगाने वाहन चालवू नये, मद्यप्राशन करुन वाहन चालवू नये, वाहन परवाना तसेच वाहन व वाहनचालकांनी सुरक्षा विमा वेळोवेळी नुतनीकरण करावे, रस्ता सुरक्षा उपाययोजनांची माहिती करुन घ्यावी, त्यासाठी स्वत:हून पुढाकार घ्यावा, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे,असे आवाहन वाहतूक पोलीस शाखेतर्फे करण्यात येत आहे.

## गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये आयुष मंत्रालयाच्या प्रकृती परीक्षणाच्या उपक्रमांत बुलढाण्याच्या ए. एस. पि. एम. आयुर्वेद कॉलेज चे महत्वाचे योगदान - ना. प्रतापराव जाधव

# बुलढाणा येथील ए. एस. पि. एम. आयुर्वेद महाविद्यालय देशभरातील पदवी आयुर्वेद महाविद्यालयात अव्वल

वृत्तसंस्था/ बुलढाणा

केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या वतीने देशातील नागरिकांच्या आरोग्यासंदर्भात आयुर्वेद शास्त्राच्या माध्यमातून अधिक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी राष्ट्रीय आयुर्वेद दिवसाच्या महोत्सवानिमित्त देश का प्रकृती परीक्षण या अभिनव उपक्रमाची घोषणा केल्यापासुन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनात सदर अभियानांतर्गत दिनांक २६ नोव्हेंबर संविधान दिवसापासून दिनांक २५ नोव्हेंबर भारतरत्न अटल बिहारी वाचपेयी यांच्या जयंती दिनांपर्यंत या अभियानात बुलढाणाच्या अजिंठा रोडस्थित आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाच्या आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व अनुसंधान संस्था संपूर्ण देशातील आयुर्वेद पदवी महाविद्यालयांमधून अव्वल स्थान प्राप्त केले असून १ लाखापेक्षा अधिक संख्येने बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांचे प्रकृती परीक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेंद्र वाघ सरांच्या प्रेरणेने, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. मधुकरराव जायभाये व सचिव श्री. पंजाबराव इलग यांच्या सहकार्याने तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. राजेश्वर उबरहंडे यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात यशस्वीतेरित्या करण्यात आले असून हि बाब बुलढाणा जिल्ह्याकरिता गौरवान्वित करणारी आहे. त्यानिमित्ताने आयोजित सत्कार समारंभात केंद्रीय आयुष स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. श्री. प्रतापरावजी जाधव, राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री, प्रकाश आबिटकर, केंद्रीय आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, केंद्रीय भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाचे सभापती वैद्य जयंत देवपुजारी, अभियान समन्वयक डॉ. आशुतोष गुप्ता आदी मान्यवरांच्या शुभहस्ते आज नरिमन पॉइंट, मुंबई येथे संस्थेचे कोषाधक्ष व प्राचार्य डॉ राजेश्वर उबरहंडे आणि सचिव श्री. पंजाबराव इलग यांनी महाविद्यालययाच्यावतीने प्रतिष्ठित असा धन्वंतरी पुरस्कार



सन्मान स्वीकारला. ए. एस. पि. एम. आयुर्वेद महाविद्यालय, अजिंठा रोड, बुलढाणाच्या चमुने केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या निर्देशनुसार संपूर्ण जिल्यातील बुलढाणा, चिखली, मेहकर, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार, खामगांव, नांदुरा, मोताळा, मलकापूर, शेगाव, जळगाव जामोद व संग्रामपूर या सर्व १३ तालुक्यांमध्ये सर्व महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, परिसरातील ग्रामीण क्षेत्र आदी भागात नियोजनबद्ध पद्धतीने प्रत्यक्षात दाखल होऊन प्रत्येक नागरिकांची आरोग्य तपासणी करून प्रकृती परीक्षण अँप मध्ये दिलेल्या प्रत्येक मुद्याची पडताळणी करून १ लाखापेक्षा अधिक नागरिकांचे यशस्वीतेरित्या प्रकृती परीक्षण केले. सदर उपक्रमात महाविद्यालयाच्या ३२ प्राध्यापक व ४८७ विद्यार्थी असे एकूण ५१९ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवून अभियान यशस्वी केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958